2431

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय पत्ता :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल

कार्यालय क्र. : २७४५८०४०/४१/४२ Email : panvelcorporation@gmail.com

दिनांक २४/०९/२०२४

जा.क्र.पमपा/DAY-NULM/SUSV/२४२४/प्र.क्र. ६ ९७५/२०२४

प्रति,
मा. सहायक आयुक्त,
जनसंपर्क विभाग,
पनवेल महानगरपालिका

विषय : जाहिर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते कि, डे-एन.यु.एल.एम विभागामार्फत तयार करण्यात आलेले जाहिर आवाहन (**विषय : पनवेल शहरातील नगर पथविक्रेता समिती गठीत करणेकरीता इतर मंडळ / संघ प्रतिनिधींची निवड करणेकामी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत**) जा.क्र. पमपा/ DAY-NULM/SUSV/ २४२४/प्र.क्र. ६८ ९७५/२०२४ दि. २५/०९/२०२४ रोजीच्या दैनिकात कमीत कामी जागेत व शासकीय दराने प्रसिद्ध करणेस विनंती आहे, तसेच अंकाच्या ५ प्रती त्याच दिवशी सादर करणे.

सोबत : जाहिर आवाहन

विभाग प्रमुख,
डे-एन.यु.एल.एम.विभाग
पनवेल महानगरपालिका.

01
२४/०९
दै. रामप्रहर
दै. कृषीवल
दै. किल्ले पनवेल

D:\nulm\d drive\DAY NULM\Street Vendor\2023-24\नगरपथविक्रेता समिती\समिती सदस्य नेमणूक. सप\जाहिरात प्रसिध्दी पत्र.docx 3

# पनवेल महानगरपालिका

## दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान

## "जाहीर आवाहन"

---

**पनवेल महानगरपालिका- नगर पथविक्रेता समिती घटित करणेकरीता इतर मंडळ / संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.**

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४-अ, दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ (भाग-२-ख) अन्वये पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी विविध मंडळ/संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) व्यापारी संघ (१ सदस्य), यांचेकडील प्रतिनिधींची निवड करण्यात येईल. सदर संघाकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल.

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५. संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.09/१०/२०२४ अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी नमुद संघाकडील इच्छुक व्यक्तींनी नामनिर्देशन अर्ज आवक जावक विभागास सादर करावेत. तदनंतर पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती सदस्य नेमणूकीकरीता संघातील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. तरी, इच्छुक व्यक्तींनी विहित वेळेमध्ये आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

टिप : नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे-एन.यु.एल.एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

**सही/-**
**(बाबासाहेब राजळे )**
**उप आयुक्त तथा,**
**शहर प्रकल्प अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/DAY-NULM/SUSV/२४२४/प्र.क्र.६/९८५/२०२४
दिनांक २४/09/२०२४

Scanned with OKEN Scanner